आत्म विश्वासाने आपण कोणतेही काम करू शकतो.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ३ जून २०२५ | अंक १७१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# कांदा पुन्हा रडवणार?

## किंमती गगनाला भिडणार, पावसाने केला मोठा खेळ

### अवकाळी पावसाने कांदा उत्पादक शेतकर्यांचे मोठे नुकसान झाले

दक्षिण आणि मध्य भारतात अवकाळी आणि पूर्व मान्सून पावसाने धुवादार बॅटिंग केली. मे महिन्यातच पावसाने अनेक रेकॉर्ड ब्रेक केले. त्यामुळे हाता तोंडाशी आलेले काही पीक हातचे गेले. मुसळधार पावसाने कोट्यवधी रुपयांच्या कांद्याचे पीक खराब झाले. त्यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या संघटनेने नुकसान भरपाईची मागणी केली. शेतकऱ्यांनी प्रति एकर 1 लाख रुपये भरपाईची मागणी केली आहे. कांद्याचे मोठे नुकसान झाल्याने आता कांद्याचा भाव वधारणार का, असा सवाल केला जात आहे. नुकसान भरपाईची मागणी कांदा उत्पादकांनुसार, ज्या कांद्याची कापणी झाली होती, पण तो जमा करता आला नाही. तो कांदा खराब झाल्याचे म्हटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रति क्विंटल 2000 रुपये सबसिडी देण्याची मागणी केली आहे. कारण हा कांदा सडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तसेच यातील जो माल चांगला आहे, त्याला सुद्धा कमी भाव मिळण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांचा हजारो क्विंटल कांदा सडल्याचे आणि त्यांचे नुकसान



### मुसळधार पावसाने कांद्याच्या उत्पादनाला फटका

राज्यातील कांदा उत्पादक संघटनेने भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघाला, NAFED ने पारदर्शक कांदा खरेदीची मागणी केली आहे. याविषयीचे पत्र त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवले आहे. मे महिन्यात अभूतपूर्व पाऊस कोसळला. नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, पुणे, सोलापूर, सांगली, बीड, धाराशिव, परभणी, जालना, बुलढाणा, अकोला या जिल्ह्यात कांदा उत्पादन घेण्यात येते. तिथे हा फटका बसला. त्यामुळे उत्पादन घटण्याची भीती व्यक्त होत आहे.

### कांद्याच्या किंमती वाढतील का?

मुसळधार पावसात कांदा खराब झाल्याने येत्या काळात बाजारात कांद्याचा तुटवडा होऊन किंमत वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. गेल्या वर्षी पण पावसाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले होते. त्यामुळे किंमती वधारल्या होत्या. कांद्याचे संकट दूर करण्यासाठी केंद्र सरकारला युद्ध पातळीवर काम करावे लागले होते. अनेक शेतकरी या काळात मालामाल झाले होते. बफर स्टॉकसाठी आतापासूनच केंद्र सरकारने हालचाल करण्याची मागणी करण्यात येत आहे.

### महावितरणच्या हलगर्जीपणामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांवर आली उपासमारीची वेळ.

## पाटोदा महावितरण कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

पाटोदा

पाटोदा येथील महावितरण उपविभाग या ठिकाणी जवळपास 32 कंत्राटी कामगार असून या कामगारांना मार्च महिन्यापासून अद्याप पगार न मिळाल्यामुळे या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दिनांक एक जून पासून काम बंद करण्याचा इशारा दिला असून त्या प्रकारचे निवेदनही त्यांच्या उपअभियंता महावितरण पाटोदा यांना देण्यात आले आहे.

महावितरण च्या पाटोदा विभागात कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचारी मार्च 2025 पासून वेतनाविना काम करत असून त्यांना वेळोवेळी पगार न मिळाल्याने त्यांच्या वर उपासमारीची वेळ आली आहे. पगाराबाबत प्रत्येक वेळी आश्वासन देऊन त्याची कुठेही अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे त्यांचा संयम आता संपत आला आहे. वेळोवेळी विनंती अर्ज आणि निवेदन देऊनही वेतन न मिळाल्याने आता या कर्मचाऱ्यांनी रविवार दि .1 पासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे. मागील तीन महिन्याच्या थकीत वेतनासाठी दहा मे रोजी निवेदन देण्यात आले होते परंतु त्याची दखल घेण्यात आली नाही. याबाबत पुन्हा कर्मचाऱ्यांनी 26 मे रोजी मुख्य अभियंता औरंगाबाद व विभागीय कार्यालयांना निवेदन देत काम बंद करण्याचा इशारा दिला होता. * तीन महिन्यांपासून पगार रखडले असल्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांना बेमुदत संपावर जाण्याची वेळ आलेली आहे. तरी सर्व कंत्राटी कर्मचारी एक जून 2025 पासून संपावर गेले आहेत.

## बिंदूसरा मध्यम प्रकल्पावर जाणे धोकादायक ; सावधानता अन सुरक्षिततेचे आवाहन

बीड दि. 02 ( जिमाका ) :-बिंदूसरा मध्यम प्रकल्प, मौजे पाली ता.जि. बीड येथे धरण पूर्ण क्षमतेने भरले असून धरणाच्या सांडव्यावरून मोठया प्रमाणात पाणी वाहू लागले आहे. या दृश्याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोठया संख्येने धरण परिसरात गर्दी करत आहेत. मात्र सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असून, नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

• धरण परिसरात गर्दी करु नये: पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असून, अचानक पाण्याची पातळी वाढू शकते. त्यामुळे नागरिकांनी धरण परिसरात जाणे टाळावे.

• फोटो आणि सेल्फी टाळावेत: धरणाच्या काठावर उभे राहून फोटो किंवा सेल्फी घेणे अत्यंत धोकादायक आहे अशा कृतीमुळे अपघात होण्याची शक्यता वाढते.

• पालकांनी मुलांवर लक्ष ठेवावे: मुलांना धरण परिसरात जाण्यापासून रोखावे आणि त्यांच्या हलचालीवर लक्ष ठेवावे.

• प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे: स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

आपल्या आणि आपल्या कुंटूंबाच्या सुरक्षिततेसाठी वरील सूचनांचे पालन करणे अत्यांवश्यक आहे.धरण परिसरात कोणत्याही प्रकारचे बेजबाबदार वर्तन टाळावे.

*****


## शिवसैनिकांनो बॅनर नको, गरजवंतांना मदतीचा हात हीच माझ्यासाठी खरी शुभेच्छा- अनिलदादा जगताप



बीड, प्रतिनिधी- शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस येत्या बुधवार, ४ जून रोजी असून प्रत्येक वर्षी हा दिवस जिल्हाभरातील शिवसैनिकांसाठी एक उत्सव असतो. निष्ठावंत शिवसैनिकांकडून अनिलदादांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात, शहरभर बॅनर्स लावले जातात आणि हा दिवस जल्लोषात साजरा होतो. मात्र यंदा अनिलदादांनी आपल्या शिवसैनिकांना एक भावनिक आणि विचारप्रवृत्त करणारे आवाहन केलं आहे. त्यांनी आपल्या अधिकृत फेसबुक पेजवरून शिवसैनिकांना सांगितलं आहे की, "माझा वाढदिवस बॅनरमुक्त करा. हे बॅनर लावण्यासाठी लागणारा खर्च लाखोंच्या घरात जातो. त्याऐवजी हा पैसा गरजूंवर खर्च करा." अनिलदादांचे हे आवाहन केवळ एक विनंती नसून समाजासाठी आपली जबाबदारी ओळखणाऱ्या नेत्याचे भावनिक मनोगत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत. अशा वेळी रस्त्यांवर भरपावसात भाजी विकणारे, कामावर जाताना मजूर, यांच्यासाठी रेनकोट किंवा छत्र्यांचे वाटप हा एक छोटा प्रयत्न असला, तरी त्यांना दिलासा देणारा हात ठरेल. माझा खरा वाढदिवस तेव्हाच साजरा होईल, जेव्हा गरिबांच्या चेहऱ्यावर तुमच्या मदतीमुळे हास्य उमटेल," असं सांगत अनिलदादांनी शिवसैनिकांना एक नवा विचार देत वाढदिवस गरजावंतांना मदतीचा हात द्या असे आवाहन केले आहे.

**सामाजिक उपक्रमांनी होणार अभिष्टचिंतन!**

अनिलदादांच्या प्रेरणादायी आवाहनाला प्रतिसाद देत, जिल्हाभरातील शिवसैनिक अनिलदादांच्या वाढदिवसावर होणाऱ्या विविध खर्चातून सामाजिक उपक्रम राबवणार आहेत. अनेक ठिकाणी रेनकोट वाटप, अन्नदान, आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर तसेच विविध समजपयोगी उपक्रमांचे आयोजन शिवसैनिक करणार आहेत.




## भायाळा मंगेवाडी तलाव ओव्हरफ्ला

पाटोदा । प्रतिनिधी तालुक्यात मे महिन्यात झालेल्या पावसामुळे मंगेवाडी.भायाळा तलाव ओव्हरफ्लो झाले तर दासखेड येथील तलावामध्ये ८०% टक्के पाणीसाठा आला असून यामुळे पाणीटंचाई दूर झाली आहे याबाबत अधिक माहिती अशी की तालुक्यात मे महिन्यामध्ये बहुतांशी ठिकाणी जोराचा पाऊस झाल्यामुळे तालुक्यातील मंगेवाडी. भायाळा तलाव ओव्हरफ्लो झाला आहे तर दासखेड तलाव मध्ये ८० टक्के पाणीसाठा झाला असून त्याचप्रमाणे महासांगवी २०% धनगरजवळका .८ टक्के पाचंग्री.७ टक्के




भुरेवाडी १० टक्के.इंचरणा.२५ टक्के लांबरवाडी .१६ टक्के सौताडा १२ टक्के वसंतवाडी.२० टक्के पाणी आलं असून यामुळे तालुक्यातील पाणीटंचाई दूर झाली असल्याचे समजते

# नगररोड क्रॉसिंग साठी आ क्षीरसागर आग्रही!

June 2, 2025

बीड – बीड शहरातून जाणाऱ्या आणि सर्वाधिक वर्दळीच्या असलेल्या नगर रोडवर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगर नाका या दरम्यान एकही क्रॉसिंग नसल्याने नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. राँग साईडने गाड्या येतं असल्याने अपघाताची भीती आहे, या प्रश्नावर बीडचे आ संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचा आग्रह धरला. बीड मतदारसंघातील रस्ते तसेच विविध विषयांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा बैठक घेतली. या बैठकीत नगर रोडवरील डिव्हायडर व रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करणे, राजुरी ते खरवंडी रस्त्यावरील पुलाचे रखडलेले काम, लिंबागणेश-मांजरसुंबा रस्त्यावरील जाधव वस्तीजवळ साठत असलेले पाणी, बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधाऱ्याचे संथगतीने होत असलेले काम, बीड शहरातील बार्शी रोडवर असलेला राष्ट्रवादी भवन समोरील मोठा खड्डा दुरूस्त करणे तसेच नगरपरिषदेकडून शहरात सुरू असलेल्या स्वच्छता काम व पाणीपुरवठा या विविध विषयांचा आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा घेतला. मतदारसंघातील बीड शहर आणि ग्रामीण भागातील रस्ते, पूल आणि विविध त्यासंबंधित विविध विषय तसेच शहरातील पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. या बैठकीत नुकत्याच नवीन झालेल्या नगर रोडवरील दुभाजकांवर आणि रस्त्याच्या



दोन्ही बाजूंनी वृक्षारोपण करणे, नवगण राजूरी येथे खरवंडी ते राजूरी रस्त्यावरील पूलाचे रखडलेले काम, लिंबागणेश ते मांजरसुंबा रस्त्यावर जाधववस्ती जवळ पाणी साठते यावर मार्ग काढणे, बीड शहरात बिंदुसरा नदीवर बंधारा कम पुलाचे काम संथगतीने सुरू आहे या कामाची गती वाढवणे, बार्शी रोडवरील राष्ट्रवादी भवन समोर पडलेला मोठा खड्डा दुरूस्त करणे तसेच बीड शहरात सुरू असलेल्या स्वच्छता काम आणि पाणी पुरवठ्याच्या कामांचा आ.संदीप क्षीरसागर यांनी आढावा घेऊन संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या. यावेळी माजी आ.सय्यद सलीम तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालयाकडे जाण्यासाठी रस्ता क्रॉसिंग असणे नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. याबाबत गेल्या अनेक दिवसांपासून सर्व स्तरांतून मागणी होत आहे. यासंदर्भात आ.संदीप क्षीरसागर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. काही दिवसांपूर्वीच आ.क्षीरसागर यांनी जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली होती. त्यानंतर आता मा.जिल्हाधिकारी यांच्या दालनात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेऊन नागरिकांच्या सोयीसाठी तातडीने नगर रोडवर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालयासमोर रस्ता क्रॉसिंग करण्याची आग्रही मागणी आ.क्षीरसागर यांनी केली.

# संपादकीय

## पाकचा थरकाप व्हावा.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकमाता अहिल्यादेवी होळकर महिला स्त्रीसशक्तीकरण महासंमेलनात भोपाळ येथे बोलताना पाकिस्तानला इशारा दिला की, ज्यामुळे पाकचा थरकाप व्हावा. कारण मोदी यांच्या धमक्यांमध्ये खरा अर्थ भरलेला असतो आणि त्यात केवळ फुकाच्या वल्गना नसतात. याची पाकसह प्रत्येक शत्रू राष्ट्राला खात्री पटलेली आहे. मोदी म्हणाले की, पाकच्या सैन्याने जर गोळ्या डागल्या तर त्यांना उत्तर हे तोफगोळ्यांनी दिले जाईल. तसेच ऑपरेशन सिंदूर ही भारताची सर्वात मोठी आणि सर्वात यशस्वी कारवाई होती हेही त्यांनी म्हटले. मोदी यांच्या वक्तव्याचा खूप खोल अर्थ दडला आहे आणि तो पाकला बरोबर माहीत आहे. कारण तोफगोळ्यांनी उत्तर देणे म्हणजे पाकचे उरले-सुरले सैन्य खलास करणे आहे आणि जगात सगळीकडे नाचक्की झालेला पाक आता आणखी नाचक्की करून घेऊ इच्छित नाही. पण हे पाकच्या मनावर आहे. मोदी यांनी पाकला इशारा देण्याचा मुहूर्त निवडला तोही खास आहे. कारण लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचा दिन म्हणजे ज्यांनी आपल्या आयुष्यातील सर्व काही लोककल्याणासाठी झोकून दिले आणि त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. तसेच लोकांसाठी जीवनभर त्या झटल्या. त्यांच्या जयंतीचा मुहूर्त साधून मोदी यांनी पाकला हा सज्जड इशारा दिला आहे. त्याला दुसराही अर्थ आहे. तो आहे आताचा भारत हा पूर्वीसारखा पाकला किंवा कुणालाच घाबरून राहणारा नाही. तो अरे ला कारेने उत्तर देतो. तो आता जागृत आहे. काँग्र`सच्या काळात भारतीय लष्कर आज आहे तसेच ताकदवान होते. पण फरक राज्यकर्त्यांच्या मानसिकतेत होता. राज्यकर्ते तेव्हा अल्पसंख्याकांना काय वाटेल याच चिंतेत असत. त्यात पाकने अनेक भारतविरोधी कारवाया केल्या पण भारताने कधीही जवाबी कारवाई केली नाही. अगदी मुंबईवर दहशतवाही हल्ला झाला तेव्हाही मनमोहन सिंग यांची पाकवर हल्ला चढवण्याची हिंमत झाली नव्हती. पण आज मोदी यांचे सरकार असल्याने पाकला हे कळून चुकले आहे की, आता भारतात भाजपाचे सरकार आहे आणि ते आपल्या कुरापतींना जशास तसे उत्तर देण्यास समर्थ आहे आणि तसे ते दाखवतातही. कोणत्याही फिजिक्सला महत्त्व असते. नुसती तुमच्याकडे ताकद असून चालत नाही तर ती दाखवण्याची तयारीही असावी लागते. भारताकडे आज ताकद आहे आणि ती दाखवण्याची तयारीही आहे. त्यामुळे पाक नामोहरम झाला आहे. कारण आता बोटचेप्या काँग्रेसचे राज्य नाही तर मोदी यांचे आहे. यातील गुणात्मक फरक पाकला कळून चुकला आहे. मोदी असेही म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर ही भारताने केलेली पाक दहशतवाद्यांविरुद्धची सर्वात मोठी आणि सर्वात यशस्वी कारवाई होती. याचा अर्थ असा आहे की याआधी पाकने अशाच दुष्ट कारवाया केल्या. पण काँग्रेस सरकारमध्ये त्यांना जशास तसे उत्तर देण्याची हिंमत नव्हती आणि त्यांनी ती दाखवलीही नाही. अर्थात याच्या कारणांमागे जाण्याची काही गरज नाही, कारण ते सर्वांना माहीतच आहे. अल्पसंख्याकांच्या लांगूलचालनात काँग्र`स सरकार गुंतले होते आणि त्यामुळे दहशतवाद्यांनी कितीही नृशंस हल्ला केला तरीही कागदी निषेधांचे भेंडोळे नाचवण्यापलीकडे काँग्रेसची धाव कधीच गेली नाही. पण आता मोदी यांनी बुलेटला उत्तर तोफगोळ्यांनी देण्याची भाषा केली आहे आणि तसे करून दाखवले आहे. त्यामुळे पाकच्या पंतप्रधानांना बंकरमध्ये लपून आपला जीव वाचवण्याची वेळ आली होती. त्याशिवाय मोदी यांनी आणखी एक महत्त्वाचा संदेश पाकला दिला आहे तो म्हणजे, टेरोरिझम कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही आणि यापुढे पाकच्या अण्वस्त्रांच्या धमक्यांना भारत घाबरणार नाही. पाकने अण्वस्त्राच्या नसलेल्या, असलेल्या जोरावर भारताला दीर्घकाळ घाबरून ठेवले होते आणि त्याकाळी काँग्रेसला हिंसाचार न करण्याची नशा चढली होती. पण समोरचा जर धमकावत असेल तर त्याला उत्तर त्याला समजेल अशा भाषेत दिले पाहिजे हे सूत्र नव्या भारताने स्वीकारले आहे. ते मोदी यांनी भारताला दिले आहे. मोदी यांना एका बाबीसाठी मानावे लागेल. ते म्हणजे, मोदी यांनी भारताला आपला मर्दपणा परत मिळवून दिला आहे. याच भाषणात मोदी यांनी महिलांच्या मऑपरेशन सिंदूरफमधील सहभागाबद्दल गौरव उद्गार काढले आहेत. त्यांनी म्हटले की, मऑपरेशन सिंदूरफ हे नुसते ऑपरेशन सिंदूर नव्हते तर भारतीय महिलांच्या बळाचा म्हणजे आविष्कार होता. त्यांचे उद्गार शतप्रतिशत खरे आहेत. कारण याच युद्धात भारताच्या जिगरबाज महिलांनी आपल्यातील शुरत्वाचे प्रदर्शन जगाला घडवले. दुसऱ्या महायुद्धात अनेक महिलांनी त्यांच्या अंगातील शौर्याचे प्रदर्शन घडवले होते. त्याच प्रकारचा महिलांच्या कर्तृत्वाचे हे प्रदर्शन होते. मोदी म्हणतात, भारतीय नारी जम्मूपासून पंजाबपर्यंत आघाडीवर राहिल्या आणि त्यांनी असामान्य शौर्य गाजवले. त्यामुळे मोदी यांचे रास्त उद्गार कुणालाही पटण्यासारखे आहेत. पंतप्रधान मोदी यांनी भारतीय महिलांच्या धैर्याबद्दल देशवासीयांना वाटणारा वाढता विश्वास व्यक्त केला आहे. लष्कराच्या तिन्ही दलात भारतीय महिला आघाडीवर राहून भारताची सेवा करत आहेत. याचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. या महिलांनी असामान्य शौर्य दाखवले आहे. अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मजयंतीनिमित्त मोदी यांच्यासारख्या देशभक्ताने त्यांना यापेक्षा जास्त चांगली श्रद्धांजली वाहणे शक्य नाही. मोदी यांच्या भाषणाने पाकचा थरकाप उडाला असेल तर त्याला भारताचा नाईलाज आहे. कारण पाकच्या करतुती तशाच आहेत, त्यामुळे पाकला कधी ना कधी हे भोगावेच लागणार होते. पण काँग्रेसच्या काळात तो निवांत होता.

# रुटीन जीवन जगण्यापेक्षा जीवन शैलीत बदल करून जीवनाचा आनंद द्विगुणीत करा. श्रीमती लता वाघचौरे यांचे प्रतिपादन

(छत्रपती संभाजीनगर). जि. प. प्रशाला अंबेले हळ ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर यांचा अप्रतिम आणि अतुलनीय स्नेह मिलन कार्यक्रम १ जून २०२५ जि. प. प्रा. शा. अंबेलोहळ व जि. प. प्रशाला अंबेलोहळ ता. गंगापूर येथील विद्यार्थी बॅच सन२००६-२००७ च्या विद्यार्थांनी आयोजित केलेला गेट टू गेदर अर्थात (स्नेहमिलन सोहळा) २०२५ अत्यंत दिमाखदार पद्धतीने आज दि.१ जून २०२५ रोजी सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत पुणे हायवेवर हॉटेल वृंदावन या ठिकाणी उत्साहवर्धक आनंदीमय वातावरणात पार पडला. त्याबद्दल सर्व प्रथम हा कार्यक्रम हाती घेणारे आघाडीचे फलंदाज मंगेश, फिरोज, जावेद, अरुण, राजेश, किशोर, विद्या व ज्ञात अज्ञात सर्वांचे मी कौतुक करतो.

कार्यक्रम हा १८ वर्षापूर्वी इयत्ता १०वी झालेल्या विद्यार्थी विद्यार्थीनी साठी आयोजित असल्यामुळे पुन्हा एकदा आजच्या दिवशी १ जून २०२५ रोजी शाळा भरली. असे वाटत होते . सुरुवातीला सर्व विद्यार्थी विद्यार्थीनीना तसेच गुरुजनांचा मानाचा फेटा बांधण्यात आला होता. व गेटपासूनच प्रत्येकाच्या हातात गुलाब पुष्प देऊन स्वागत केले जात होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचलन सन्मा. एच. पी दादा यांनी केल्यामुळे कार्यक्रमांची रंगत वाढतच चालली होती. सर्व प्रथम कडक आवाजात आर्डर ऐकू आली व सामुहिक राष्ट्रगीत म्हटले गेले. ज्या विद्यार्थ्यानीने ( श्रीमती वाघमोडे)८ वी ते १० वी पर्यंत प्रार्थना म्हटली होती पुन्हा त्याच विद्यार्थ्यीनीने अप्रतिम प्रार्थना गाऊन स्नेह मिलन समारंभाचा आरंभ केला.

शिक्षणाचे आराध्य दैवत व सरस्वती पूजन होऊन ५-६ विद्यार्थी व ४-५ विद्यार्थीनींनी आपले दिलखुलास मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर सन्मा. मा. मुख्याध्यापक वाघचौरे मॅडम,:- सशक्त बना. व्यायाम करा. निरोगी रहा. छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनाचा आनंद घ्या. असे प्रतिपादन केले. श्रीमान जी. एम. पाटील सर :- विद्यार्थ्यांनी आई वडीलांची व विद्यार्थ्यीनींनी आपल्या सासू सासऱ्यांची सेवा केली तर जीवनाचे सार्थक मानावे. व्यसनापासून आयुष्यात अलिप्त राहण्याचा सल्ला दिला. श्रीमती चौधरी मॅडम. श्रीमान एन सी. प्रधान सर:- आप कमाईवर मोठे व्हा. फुकटाची हरामाची कमाई करू नये. त्यामुळे जीवन बरबाद होते असे म्हणाले. श्रीमती मुळे मॅडम. श्रीमान केंद्रप्रमुख काळवणे सर. श्रीमती बरबडे मॅडम, श्रीमती कर्डीले मॅडम , श्रीमान इंगोले सर, श्रीमती वैशाली नंदन-पगारे मॅडम, कवी:- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर श्रीमान एच . पी. गांगर्डे सर यांचा शाल पुष्प व स्मृतीचिन्ह देऊन यथोचित गुरुगौरव करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांनी आपली ओळख परेड करून दिली. कोणी मोठा नाही कोणी लहान नाही. सगळेच एका वर्गातील रांगेतील विद्यार्थी म्हणून मोकळ्या मनाने हसत खेळत आपला परिचय देत होते. मध्ये मध्ये शिककांचे अनुभव व त्या वेळेसच्या डॉयलॉगची आठवण ही करून देत होते. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सर्वांनीच आपला परिचय संपूर्ण सभागृहाला करून दिला. श्रीमती स्मिता बरबडे:- खरोखर आजचा कार्यक्रम खूप अविस्मरणीय आहे ज्यांनी ज्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली त्या सर्वांचे खूप खूप अभिनंदन मुलांनो तुम्ही सर्वानी आम्हाला बोलावले व आमचा जो सत्कार केला तो माझ्यासाठी एखाद्या आदर्श शिक्षक पुरस्कारापेक्षा खूप अनमोल आहे आज सर्वांना भेटून फार आनंद झाला. असेच भेटत जा, ओळख ठेवा हीच अपेक्षा तुम्हा सर्वांच्या हातून सत्कार्य घडो, निरोगी राहो तसेच निर्व्यसनी राहोत हीच इच्छा धन्यवाद. श्रीमान संतोष इंगोले:-आजचा स्नेह मिलनाचा कार्यक्रम खूपच सुंदर झाला. अगदी दृष्ट लागावी असा. सर्व विद्यार्थी मित्र मैत्रिणींच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता, एकमेकांच्या हातात हात घेताना किंवा गळा भेट घेताना जाणवणारा उत्साह अवर्णनीय असा होता. माझ्या आयुष्यातील हा पहिलाच कार्यक्रम कारण आम्ही इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या शाळेतच आज पर्यंत शिकवले. तेव्हा त्यांच्याकडून असे कार्यक्रम होतील अशी अपेक्षाच नव्हती. परंतु माझ्या इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या आग्रहामुळे व प्रेमामुळे मला या कार्यक्रमाला येता आले आणि आपणा सर्वांना भेटून मला माझ्या शालेय जीवनात परत जाता आले, ते सुवर्णक्षण पुन्हा जगता आले, शाळेच्या आठवणीत रमता आले. तुमचा उत्साह पाहून आम्हालाही जगण्याची नवी उमेद मिळाली. खरोखरच मैत्रीमध्ये किती शक्ती असते ती जाणवली त्या क्षणी आपण सर्व दुःख बाजूला ठेवून आनंदाने प्रत्येक क्षण जगलो. हेच व्हिटामिन "F"म्हणजे फ्रेंडशिप सदैव आपल्या सोबत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



श्रीमती लता वाघचौरे ( माजी मुख्याध्यापिका) खरोखरच आजचा कार्यक्रम छान झाला तुम्हा सर्वांचा उत्साह पाहून खूप आनंद झाला आमचे सर्व सहकारीही आम्हाला भेटले अगदी ताट समोर आल्यावर भूकेची जाणीव झाली असेच सोबत रहा सकारात्मक रहा निरोगी रहा निर्व्यसनी रहा आनंदात रहा हीच सदिच्छा मेहनत घेतलीत त्याचे चीज झाले. श्रीमान गोरख काळवणे:- शिक्षक म्हणून काम करताना अनेक अनुभव मिळतात, परंतु काही क्षण असे असतात की जे मनाच्या एका खास कप्प्यात कायमचे जपून ठेवावेसे वाटतात. आज विद्यार्थ्यांनी आयोजित केलेला गेट-टुगेदर कार्यक्रम हा असाच एक मनाला भिडणारा, हृदयस्पर्शी आणि आनंददायी अनुभव ठरला. विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मीयतेने, प्रेमाने आणि उत्साहाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. सुरुवातीलाच प्रार्थनेने वातावरण प्रसन्न झाले. एकापेक्षा एक प्रतिक्रीयांनी सर्वच भारावून गेले. माझ्या अध्यापनाच्या प्रवासातील काही प्रसंग हे सर्व अगदी आपुलकीने आणि आदराने सांगण्यात आले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनातील कृतज्ञतेची भावनाही व्यक्त केली. हेच शिक्षक म्हणून आमच्यासाठी सर्वात मोठं बक्षीस असतं – विद्यार्थ्यांच्या मनातील आमची जागा आणि त्यांचं प्रेम दिसून आलं . मी मन:पूर्वक आभार मानतो सर्व विद्यार्थ्यांचे, ज्यांनी इतक्या मन:पूर्वक हा कार्यक्रम आखला आणि मला एक अमूल्य आठवण दिली. तुमचे हे प्रेम, आदर आणि स्नेह माझ्या हृदयात सदैव राहील. तुम्हा सर्वांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा! या निमित्ताने गुरुगौरव केला! त्याबद्दल खूप खूप धन्यवाद. श्रीमती वैशाली नंदन:-सर्व प्रथम कार्यक्रमाचे आयोजक आणि प्रायोजक यांचे मनापासून धन्यवाद. अतिशय सुंदर असे स्नेह मिलन आपण घडवून आणले.आणि पुन्हा त्या आठवणींना उजाळा मिळाला. आज तुमच्या या भेटीने खुपच आनंद वाटला. श्रीमती सुलभा मुळे :-माझ्या लाडक्या विद्यार्थी विद्यार्थिनींआजचा कार्यक्रम खूपच सुंदर,अविस्मरणीय झाला. सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप खूप मेहनत घेतली त्या सर्वांचे हार्दिक हार्दिकअभिनंदन मुलांनो तुम्ही सर्वानी आम्हाला ....सर्व गुरुजनांना बोलावले व आमचा सत्कार केला. आमच्याबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. आम्ही कृतकृत्य झालो. तुम्ही दिवस-रात्र मेहनत करून आम्हाला जो आनंद दिला तो अ वर्णनीय आहे .आज सर्वांना भेटून फार आनंद झाला. असेच भेटत रहा, ओळख ठेवा . तुम्हा सर्वांच्या हातून सत्कार्य घडो, तुम्ही सदैव आनंदी राहा. निरोगी रहा. आज तुम्ही जो आनंद आम्हाला दिला त्याने आमचे आयुष्य वाढले असे मी म्हणेन. धन्यवाद तुम्हाला पुढच्या आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा. यशस्वी व्हा हाच आशीर्वाद. आज तुमच्या या सत्काराने जाणवते की तुमच्याशी असलेले नाते केवळ वर्गापुरते मर्यादित नाही, तर ते मनापासूनचे आणि आयुष्यभराचे आहे. श्रीमती आशा कर्डिले:-आजच्या कार्यक्रमाचे आयोजक आमचे विद्यार्थी या सर्वांचे खुप खुप धन्यवाद कार्यक्रमाचा आनंद जसा तुम्ही सर्वांनी घेतला तसेच आम्हीही खूप खुश झालो पुनश्च एकदा धन्यवाद असेच भेटत राहा तुमच्या सोबत आमचाही आनंद द्विगुणित करा पुन्हा एकदा तुमच्या प्रेमळ सत्कारासाठी मनापासूनधन्यवाद! असेचनेहमीसंपर्कातराहा.

# आरजेएमडीएस इंग्लिश स्कुल, जोगेश्वरीच्या विद्यार्थ्यांचे कराटे स्पर्धेत नेत्रदिपक यश

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी श्रीलंका (कोलोंबो) येथे नुकत्याच झालेल्या ९ व्या एशिया गोजु रयु कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत रत्नागिरी जिल्हा मराठा ज्ञाती समाज मुंबई संचालित आरजेएमडीएस इंग्लिश स्कुल, जोगेश्वरीच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश संपादन केले. टीम कुमिटे - या स्पर्धेत अक्षर पालव व अर्णव शेळके यांनी सुवर्ण पदक मिळविले आहे. तसेच टीम काटा या स्पर्धेतही या दोघांनी रौप्य पदक मिळविले आहे. टीम काटा स्पर्धेत अक्षर पालव,अर्णव शेळके व मोक्षदा शेळके यांना ब्रांझ पदक प्राप्त झाले आहे. विद्यार्थी व प्रशिक्षक भीमराव पवार आणि धीरज पवार या सर्वांनी श्रीलंकेत जाऊन यश संपादन केल्या बद्दल र.जि.म.ज्ञा.स.संस्थेचे कार्याध्यक्ष व आरजेएमडीएस इंग्लिश स्कुल चे चेअरमन सहदेव सावंत, संस्थेचे उपकार्याध्यक्ष अशोक परब,संस्थेचे सरचिटणीस जितेंद्र पवार, शाळेचे सी.ई.ओ. दीपक खानविलकर, कार्यकारणी सदस्या इंद्रायणी सावंत, मुख्याध्यापिका डींपल दुसाने, आणि शबनम मॅडम यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. जोगेश्वरीतिल विविध संस्था, व नागरीकांकडून आरजेएमडीएस इंग्लीश स्कुलच्या विदयार्थ्यांचे, पालकांचे, प्रशिक्षकांचे सर्व थरातुन अभिनंदन केले जात आहे.



# बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेला कर्तव्यदक्ष दबंग मा पोलीस निरीक्षक मिळाल्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र त्यांचे होत आहे अभिनंदन .

बीड प्रतिनिधी.

बीड जिल्हा पोलीस दलामध्ये सर्वात महत्त्वाची असलेली स्थानिक गुन्हे शाखा या स्थानिक गुन्हे शाखेला अतिशय कर्तव्यदक्ष आणि बीड जिल्ह्याचा सखोल ज्यांना अभ्यास झाला आहे असे दबंग आणि कर्तव्यदक्ष मा पोलीस निरीक्षक मा श्री शिवाजी बंटेवाड साहेब हे स्थानिक गुन्हे शाखेला मिळाल्यामुळे बीड जिल्ह्यामधून त्यांनी केलेल्या मागील बीड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या उत्कृष्ट कर्तव्याबद्दल सर्व नागरिकांमधून बीड जिल्ह्यातील समाधान व्यक्त होत आहे व बीड जिल्ह्यामधून सर्वत्र सध्या साहेबांचे अभिनंदन व कौतुक होत आहे याच पार्श्वभूमीवर त्यांच्या मागील उत्कृष्ट पोलीस प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने समाधान व्यक्त करून त्यांना पुढील प्रशासकीय कार्यास शुभेच्छा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मा श्री बीबी वैद्य साहेब तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र सचिव मा श्री सुनील दादा महा कुंडे तसेच नारायण शिंदे व लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर तसेच स्वराज्य वृत्त या वर्तमानपत्राचे मुख्य संपादक मा अनिल कचरे साहेब तसेच बीड येथील बस स्टैंड वर अतिशय उत्कृष्ट आणि चांगल्या प्रकारे सर्वांच्या गाड्या सांभाळण्याचे कार्य करणारे असे पत्रकार संघाचे सदस्य अत्तर भाई खान सह मान्यवर उपस्थित होते साहेबांचे अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्यानंतर साहेबांनी सांगितले की बीड जिल्ह्यामध्ये कोणाचीही गुंडगिरी किंवा भाईगिरी खपवून घेतली जाणार नाही त्यांच्या वरती कायदेशीर कारवाई करण्यात येईल कोणी जर गुंडगिरी किंवा भाईगिरी करण्याचा प्रयत्न केला विनाकारण कोणाला कोणी त्रास दिला तर डायरेक्ट माझ्याशी संपर्क करा असे उद्गार देखील साहेबांनी लोकशाही पत्रकार संघांचा मनस्वी सत्कार स्वीकारल्यानंतर मोजक्या शब्दात आपले मनोगत व्यक्त केले या नंतर बीबी वैद्य साहेब यांनी साहेबांना शुभेच्छा दिल्यानंतर पुढील मनस्वी त्यांच्या थोडक्यात सदिच्छा व्यक्त करताना



सांगितले की बीड ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या सर्व गावांना मा श्री शिवाजी बंटेवाड साहेबांनी सातत्याने भेटी देऊन गावातले छोटे-मोठे तंटे मिटवण्यामध्ये आणि गोरगरीब सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यामध्ये एक मोठे यश संपन्न केले आहे आणि लोकांच्या मनामध्ये एक आगळवेगळे आपले स्थान निर्माण केले आहे तसेच आपले पुढील पोलीस प्रशासकीय कर्तव्य ते भविष्यात बीड जिल्हा पोलीस दलातील एक महत्त्वाच्या असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यामध्ये मोठे यश मिळवतील आणि बीड जिल्हा पोलीस दलाचे नाव व बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेचे नाव महाराष्ट्रामध्ये एक आगळे वेगळे चांगल्या प्रकारे पोलीस प्रशासकीय कर्तव्य त्यांच्या सर्व स्थानिक गुन्हे शाखेच्या सर्व टीमच्या माध्यमातून ते उत्कृष्ट प्रकारे बजावून एक आदर्श महाराष्ट्र मध्ये निर्माण करतील असी अपेक्षा ही या वेळी लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य यांनी सदिच्छा पर व्यक्त केली.

## मा.सु.पा महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



दै. प्रजा-शासन न्यूज / प्रतिनिधी मंगेश खाडे मानोरा स्थानिक मातोश्री सुभद्राबाई पाटील कला विज्ञान व कै पांडुरंग ठाकरे वाणिज्य महाविद्यालय मानोरा ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्सव साजरी करण्यात आली यावेळी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे त्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते पुण्यश्लोक अहिल्याबाईच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ठाकरे यांनी चालू शैक्षणिक क्षेत्रामध्ये महाविद्यालयातील कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील अंतिम वर्षाच्या ज्या विद्यार्थिनींनी महाविद्यालयात शैक्षणिक गुणवंता व त्या अनुषंगाने इतर उपक्रमामध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावली अशा विद्यार्थ्यांनीला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मानित करण्याची घोषणा केली हा पुरस्कार स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात दरम्यान देण्यात येणार आहे या पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्याचे काम सुरू करण्यात आले असे व्यक्त केले.

## लोबकळलेल्या तारांमुळे शेतकऱ्यांना धोका – महावितरणचे दुर्लक्ष कायम



### शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न दुर्लक्षित!

शेतांमध्ये वीज पुरवठा अनेक ठिकाणी उघड्या तारांद्वारे होत असल्यामुळे त्यांची नियमित तपासणी आणि देखभाल करणे महावितरणच्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे. मात्र यामध्ये प्रचंड दुर्लक्ष होत असून, याच निष्काळजीपणामुळे अनेक शेतकरी आणि पाळीव प्राण्यांचे प्राण गेले आहेत. "महावितरणच्या मनमानी कारभारामुळे आमच्यावर संकट आले आहे. वेळेवर दुरुस्ती न केल्यास कोणतीही दुर्घटना घडू शकते."
**– सत्यकुमार जिगे, शेतकरी,**

दै. प्रजा-शासन प्रतिनिधी | मठपिंपळगाव, ता. अंबड अंबड तालुक्यातील मठपिंपळगाव शिवारातील शेतकरी सत्यकुमार दामोदर जिगे यांच्या गट क्रमांक १२८ मधील शेतात गेल्या वर्षभरापासून विद्युत वाहिन्यांच्या तारा लोंबकळलेल्या अवस्थेत असून, त्या अतिशय नीचांकी पातळीवर आल्या आहेत. परिणामी कोणालाही सहजपणे त्या स्पर्श करू शकतात, ज्यामुळे जीवितास धोका निर्माण झाला आहे. या गंभीर बाबतीत जिगे यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये अंबड येथील महावितरणच्या उप अभियंत्यांना लेखी निवेदन दिले होते. मात्र एक वर्ष उलटून गेले तरी महावितरण विभागाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे विशेष. शेतात मशागत करणेही अशा स्थितीत अत्यंत कठीण झाले आहे. शेतकरी जिगे यांनी यासंदर्भात महावितरणच्या निष्काळजी आणि बेपर्वा कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली आहे.

# सुमित राठोड यांना पोलीस दलातील सेवेला 13 वर्ष पुर्ण

प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे नागपूर दि.३१ में २०२५ पोलीस अंमलदार सुमित रमेश राठोड यांच्या सेवेला १३ वर्ष पुर्ण झाली आहेत सुमित राठोड हे दि.३१ में २०१२ ला राज्य राखीव पोलीस बल गट क्रं ४ नागपूर या ठीकाणी सशस्त्र पोलीस शिपाई पदी निवड झाली होती त्यांनी आपले मुलभुत नऊ महीण्याचे प्रशिक्षण मुंबई या ठीकाणी पूर्ण केले आणि त्यांचा पोलीस दलातील प्रवास सुरू झाला राखीव पोलीस बल यांचे संपुर्ण महाराष्ट्रासह भारतात ही बंदो लागतात सुमित राठोड नी आजवर पश्चिम बंगाल ,मध्यप्रदेश ,छत्तीसगड या ठीकाणी मतदान करिता कर्तव्य बजावले आहे या सह महाराष्ट्र राज्यात दिवाळी ,गणपती, नवरात्र ,मतदान अश्या अनेक बंदो करिता राखीव पोलीस बल यांचे कर्तृत्व राहतात या शिवाय नक्षलग्रस्त भाग गडचिरोली ,गोंदिया ,चंद्रपूर या ठीकाणी सुद्धा ब़दो लागतो सुमित राठोड यांनी य सर्व ठीकाणी कर्तव्य बजावले आहे या सोबत सुमित यांनी खात्याअंतर्गत विविध प्रशिक्षण सुध्दा केले आहेत सन-२०१६ ला एस आर पी एल आर पी फिल्ड क्राफ्ट प्रशिक्षण पुणे येथुन पुर्ण केला आहेत या नंतर सुमित राठोड यांना दि.०१ सप्टेंबर २०१९ ला सशस्त्र पोलीस नाईक पदी पदोन्नती मिळाली सुमित राठोड यांचा सेवा काळ फार छान व कर्तत्व दक्ष असल्याने सुमित राठोड यांना सन २०२१ ला नक्षलग्रस्त भागात बजावलेल्या कर्तव्य करिता कठीन सेवा पदक महाराष्ट्र शासन गृह विभाग यांच्या कडुन प्रदान झाले आहेत या नंतर सन -२०२२ ला स्वातंत्र्य अमृत महोत्सव पदक महाराष्ट्र शासन गृह विभाग याच्या कडुन प्रदान करण्यात आले सुमित राठोड यांनी आंतरराज्य बंदो योग्य रित्या पार पाडल्याने सन -२०२३ ला आंतरिक सुरक्षा पदक महाराष्ट्र शासन गृह विभाग यांच्या कडुन प्रदान करण्यात आले आहे सुमित राठोड एवढ्याच न थांबता त्यांनी महाराष्ट्र पोलीस दलातील क्रमांक एकचे प्रशिक्षण म्हणून ओळख असलेल्या जिल्हा कवायत निर्देशक प्रशिक्षण डी.डी.आय सुध्या सन २०२४ ला पुणे येथुन पुर्ण केला आहे या सोबत या १३ वर्षात बरीच लहान -मोठी अडचण आली यावर मात करुन आपले कर्तव्य बजावले पोलीस अधि,अंमलदार, गुरुवर्य,आई-बाबा ,पत्नी ,मुलगी ,दीदी ,भाऊ,कुंटुबातील सर्व सदस्य,मित्र मंडळी,नातेवाईक यांचे मी मनापासुन आभार मानतो व भविष्यात देखील सुमित राठोड अशीच सेवा देत राहील अश्या कर्तव्य दक्ष पोलीस अंमलदार यांना आमचा सैलुट आहे

# बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती तर्फे 1ले राज्यस्तरीय बांधिलकी साहित्य संमेलन मोठ्या थाटात संपन्न.

प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे अमरावती प्रतिनिधी :-बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती द्वारा आयोजित पहिले राज्यस्तरीय बांधिलकी साहित्य संमेलन शुक्रवार दि. 30 मे रोजी अमरावती येथील कांचन रिसॉर्टमध्ये मोठ्या थाटात संपन्न झाले. या एकदिवशीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक व समीक्षक मा.श्री दा. गो. काळे, उदघाटक जेष्ठ वऱ्हाडी हास्यकवी मा. श्री मिर्झा रफी अहमद बेग,विशेष अतिथी सुप्रसिद्ध साहित्यिक शंकर घोरसे, स्वागताध्यक्ष प्रसिद्ध लेखिका व उद्योजिका तसेच बांधिलकी प्रतिष्ठानच्या संचालिका मा. कांचनताई उह्ले, विशेष अतिथी शंकर घोरसे अक्षरक्रांती फाऊंडेशन नागपूर तर प्रमुख अतिथी तसेच कविसंमेलनाचे अध्यक्ष आणि कथाकथन सत्रातील कथाकार म्हणून प्रा. डॉ. सतीश तराळ उपस्थित होते त्यामुळे रसिक वर्ग आनंदी होता . प्रा. डॉ. शोभाताई रोकडे,डॉ. शोभाताई गायकवाड,मा. बाबारावजी गावंडे, मा उद्धव शहाणे,मा. आबासाहेब कडू,सुप्रसिद्ध गझलकार मा. अनंत नांदुरकर (खलिश )अजीज खान पठाण आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची शानदार सुरुवात दत्त नवनाथ भजनी मंडळ नवसारी यांच्या साथीने अगदी नियोजित वेळेत ग्रंथदिंडीनेकरण्यात आली.त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पुजन व दिपप्रज्वलन करून विधिवत संमेलनाचे उदघाटन श्री. मिर्झा रफी अहमद बेग यांचे हस्ते पार पडले.सौ. भावना देशपांडे यांनी सावित्री वंदना, सौ. छाया पाथरे यांनी स्वागतगीत तर श्री गजानन काकडे यांनी पोवाडा सादर करून संमेलनाची बहारदार सुरुवात केली.मा. ॅड. डॉ.नीता कचवे यांनी प्रास्ताविक करून पहिल्या बांधिलकी राज्यस्तरीय साहित्य संमेलनाबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली.त्यानंतर ॅड. डॉ. नीता प्रफुल्ल कचवे लिखित "छोट्या छोट्या गोष्टी जगण्याची देती दृष्टी" "संस्कार एक मौलिक शिक्षा" "संस्कारोंकी पाठशाला" "Moral Stories" डॉ. केतकी प्रदीप काळेले लिखित छुपा राक्षस हा बालकथासंग्रह,नयन पऱ्हाड लिखित "जीवी जे गुंतले" हा अभंगसंग्रह तर अक्षरशिल्प शिमगा विशेषांक या पुस्तकांचे दिमाखदार प्रकाशन संपन्न झाले.

## माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांनी 25 दिव्यांगाना दिला मदतीचा हात.

उरण दि २(दै. प्रजा-शासन प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे )रायगड जिल्ह्यामधील उरण तालुक्यामधील दिव्यांग मित्र म्हणून सुप्रसिद्ध असणारे सर्वांचे लाडके माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांनी १ जून २०२५ रोजी उरण तालुक्यातील २५ दिव्यांग बांधवांना प्रत्येकी २० हजार रुपयांचा धनादेश दिला आहे . प्रत्येक दिव्यांग स्वतःच्या पायावर उभा राहावा असे त्यांचे मत आहे. या करिता त्यांना व्यवसायासाठी मदत मिळावी म्हणून दरवर्षी दिव्यांग बांधवांना ते मदत देत आहेत. प्रत्येक दिव्यांग स्वबळावर उभा राहावा, स्वतःचा व्यवसाय करावा, असे त्यांचे म्हणणे आहे. माजी आमदार जेव्हा प्रत्यक्ष आमदार होते त्यावेळेस त्यांच्या आमदार निधीतून सदर निधी वाटप करत होते. आत्ता त्यांना मिळणाऱ्या पेन्शन मधूनही हे निरंतर चालू ठेवले आहे. दिव्यांग बांधवांप्रती असणारी आपुलकी आणि प्रेम यामुळे त्यांना दिव्यांग स्वर्गीय महादेव रामदास पाटील(मामा) यांनी माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांना 'दिव्यांग मित्र' ही उपाधी दिली.त्याचबरोबर सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी उरण तालुक्यातील प्रत्येकाला मनोहर शेठ भोईर यांनी आवाहन केले होते की एकमेकांना मदत करा. गोर गरिबांची सेवा करा. एकमेकांच्या अडचणी सोडवा. एकजूट हाऊन समस्या सोडवा असे आवाहन केले.याचाच आदर्श घेत 'आई फाउंडेशनचे' दिव्यांग संदेश राजगुरू आणि महेश पाटील यांनी १०० पेन शैक्षणिक साहित्य म्हणून वाटप केले.या कार्यक्रमा मुळे प्रत्येकाला प्रेरणा मिळाली की आपण आपले दैनंदिन जीवन जगत असताना मदतीचा हात द्यायला पाहिजे जेणेकरून तळागाळातील गरीब गरजू कुटुंबांपर्यंत आणि दिव्यांगांनाही मदतीचा हात मिळेल.माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला दिव्यांग सामाजिक संस्था उरण यांच्या सभासदांनीही मोलाचे सहकार्य दिले. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी उरण तालुक्यातील दिव्यांग मानसी विजय गावडे हिने बारावीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळवून प्राविण्य मिळवले त्याबद्दल तिला 'दिव्यांग सामाजिक संस्था उरण' कडून शैक्षणिक साहित्य देण्यात आले.सदर कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कारण दिव्यांग मित्र माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांनी केलेल्या दिव्यांगांसाठी मदतीचा हात या कार्यक्रमाचे नक्कीच प्रत्येक दिव्यांगाला सक्षम करण्यासाठी उपयोगी ठरेल.संपूर्ण महाराष्ट्रात असा एकमेव आमदार आहेत जे अगोदर आपला संपूर्ण पगार व आता निवृत्ती झाल्यानंतर म्हणजेच माजी आमदार झाल्या

## उरणमध्ये पावसाळ्यात पाणी साचणार नाही, याची खबरदारी घ्याखासदार श्रीरंग बारणे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना




उरण दि २(दै. प्रजा-शासन प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे )उरण तालुक्यातील सर्व शासकीय यंत्रांनांनी समनव्य साधून पावसाळापूर्व कामे वेगाने पूर्ण करावीत. नालेसफाईला गती द्यावी. उरण शहरात समुद्राचे पाणी येणार नाही, याची काळजी घ्यावी. जेथे पाणी येते, त्याठिकाणी भराव टाकावा. झाडांची छाटणी करावी. खराब झालेले विद्युत पोल दुरुस्त करावेत. पावसाळ्यात कोठेही पाणी साचणार नाही याची खबरदारी घ्यावी अशा सूचना मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांना केल्या. रेल्वे स्थानकाचा आढावा घेतल्यानंतर आता खासदार श्रीरंग बारणे मावळ लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेत आहेत. सोमवारी खासदार बारणे यांच्या उपस्थितीत उरण येथील पंचायत समितीत आढावा बैठक झाली. सिडको, सार्वजनिक बांधकाम, जेएनपीटी, तहसील, वैद्यकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उरणचे तहसीलदार उद्धव कदम, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, उरण नागरपरीषद मुख्याधिकारी समीर जाधव, पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसळ, शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल भगत, शिवसेना तालुका प्रमुख उरण दिपक ठाकूर, शिवसेना विधानसभा संघटक मनोज घरत, महेंद्र पाटील, उरण विधानसभा जिल्हा संघटिका मेघाताई दमडे, शहर प्रमुख सुलेमाण शेख व कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. नागरिकही उपस्थित होते. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, पावसाळापूर्व कामे वेगाने पूर्ण करावीत. नालेसफाईला गती द्यावी. समुद्राचे पाणी येते, त्याठिकाणी भराव टाकावा. झाडांची छाटणी करावी. खराब झालेले विद्युत पोल दुरुस्त करावेत. पावसाळ्यात विद्युत पुरवठा खंडित होणार नाही, याची काळजी घ्यावी. गेल्या वर्षभरात ५४ नागरिकांना सर्पदंश झाला आहे. १२५ हून अधिक नागरिकांना मोकाट श्वानाने चावा घेतला आहे. त्याची लस उपलब्ध ठेवावी. वैद्यकीय कर्मचारी वाढवावेत. डास होऊ नयेत यासाठी वेळोवेळी धुरीकरण करावे. जलजीवन अंतर्गत नऊ प्रकल्प सुरू आहेत. त्याला गती द्यावी. विद्युत वितरण कंपनीच्या माध्यमातून सुर्यघर, कुसुम योजनेबाबत जनजागृती करावी. या योजनेचा नागरिकांना जास्तीत जास्त लाभ द्यावा. पंतप्रधान आवास योजनेतील घरांच्या कामाचा दर्जा चांगला ठेवावा. काम पूर्ण झालेल्या घरांचा ताबा लाभार्थ्यांना द्यावा. रस्त्यावरील खड्डे बुजवावेत. अपघात होणार नाहीत, याची काळजी घ्यावी.अशा सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी उपस्थित शासकीय अधिकाऱ्यांना, सर्व यंत्रणेला दिले आहेत.

# राज्यात मान्सूनचा वेग मंदावला, आयएमडीच्या नव्या अंदाजानं धाकधूक वाढली

यंदा मान्सून वेळेआधीच महाराष्ट्रात दाखल झाला आहे, सामान्यपणे सात जूनच्या आसपास राज्यात मान्सूनची एन्ट्री होत असते, मात्र यावर्षी 25 मे रोजीच मान्सूनचं महाराष्ट्रात आगमन झालं. म्हणजेच तब्बल 12 दिवस वेळेपूर्वी मान्सून राज्यात दाखल झाला. मान्सून राज्यात दाखल झाल्यानंतर गेले पाच ते सहा दिवस राज्यात पावसाचा चांगलाच जोर पाहायला मिळाला, अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस झाला, मात्र



आता राज्यातील पावसाचा जोर काही प्रमाणात ओसरला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून आता मान्सूनबाबत नवा अंदाज वर्तवण्यात आला आहे. काय आहे नवा अंदाज ? महाराष्ट्रात पावसानं उघडीप दिली आहे. मान्सूनच्या वाऱ्याचा जोर कमी झाला आहे, पुढील 5 ते 7 दिवस अशीच परिस्थिती असणार आहे, 10 ते 12 जूनपर्यंत पावसाची उघडीप असणार आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी शेतीच्या मशागतीची कामं हाती घेतली पाहिजेत, असं पुणे हवामान विभागाचे हवामान तज्ज्ञ एस. डी. सानप यांनी म्हटलं आहे. दरम्यान मागील काही दिवसांपासून सातत्याने कोसळणाऱ्या पावसाने सर्वांची चिंता वाढवली होती, यावर्षी वेधशाळेने ज्याप्रमाणे अंदाज वर्तवला आहे, त्याप्रमाणे पाऊस हा जास्त होण्याची शक्यता आहे, राज्याच्या अनेक भागात 108 टक्क्यांहून अधिक पाऊस होईल असा अंदाज आहे. सध्या पीक पेरणीच्या बाबतीत शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी, असं हवामान तज्ज्ञ रामचंद्र साबळे यांनी म्हटलं आहे. राज्यात सरासरी पेक्षा अधिक पावसाची शक्यता यंदा देशासह राज्यात मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाला आहे, यावर्षी राज्यात पावसाचं प्रमाण हे सरासरीपेक्षा अधिक असेल असा अंदाज भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे, यंदा देशभरात 108 टक्के इतका पाऊस पडण्याची शक्यता आहे. यंदा पाऊस चांगला असल्यानं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र सध्या पेरणीची घाई करू नका, पावसाचा अंदाज घेऊनच पेरणीला सुरुवात करा असा सल्लाही हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
आंतरराष्ट्रीय



# G7 शिखर परिषदेला पंतप्रधान उपस्थित राहण्याची शक्यता कमी?, भारत-कॅनडा तणावाचा परिणाम ?

जून महिन्याच्या अखेरीस कॅनडामध्ये होणाऱ्या G7 शिखर परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहण्याची शक्यता कमी असल्याचे म्हटले जात आहे. सहा वर्षांनंतर अशा हाय-प्रोफाईल व्यासपीठावर त्यांची ही पहिलीच अनुपस्थिती असल्याचे म्हटले जात आहे. भारत आणि कॅनडा यांच्यातील तणावपूर्ण संबंध, तसेच सुरक्षेची चिंता आणि भारताला अद्यापपर्यंत अधिकृत निमंत्रण न आल्याचे कारण या मागे सांगितलं जात आहे. कॅनडात यावर्षी १५ ते १७ जून दरम्यान G7 शिखर परिषदेचे आयोजन होत आहे. या समिटमध्ये युरोपियन युनियन, IMF, जागतिक बँक आणि संयुक्त राष्ट्रांसह अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, इटली, जपान आणि कॅनडा या प्रमुख देशांचा सहभाग आहे. दक्षिण आफ्रिका, युक्रेन आणि ऑस्ट्रेलिया सारख्या देशांनीही या समिटमध्ये सहभाग घेणार असल्याचे म्हटले आहे. जून महिन्याच्या अखेर होणाऱ्या G7 शिखर संमेलनाचं भारताला अद्यापपर्यंत आमंत्रण मिळालेले नसल्याचे म्हटलं जात आहे. या संदर्भात अधिकृत माहीती आलेली नसली तरी खलिस्तानी दहशतवादी हरदीप सिंह निज्जर यांची हत्या झाल्यानंतर भारत-कॅनडाचे संबंध बिघडलेले असून ही पार्श्वभूमी यामागे असल्याचे म्हटले जात आहे.




## भारतच उपस्थित राहण्यास इच्छुक नाही

G7 शिखर परिषदेत भारताच्या उपस्थितीबाबत अद्यापही शंका घेतली जात आहे. भारताला जी 7 शिखर परिषदेसाठी कोणतेही औपचारिक निमंत्रण मिळालेले नसल्याचे म्हटले जात आहे. आणि जरी निमंत्रण मिळाले तरी, "भारत या संमेलनास उपस्थित राहण्यास इच्छुक नाही, असेही सूत्रांनी म्हटले आहे. कॅनडामध्ये होणाऱ्या G7 शिखर परिषदेसाठी पंतप्रधान मोदी यांच्या कोणत्याही संभाव्य भेटीबद्दल आपल्याकडे "कोणतीही माहिती नाही असे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने अलिकडे सांगितले आहे.

# रशियाच्या एका निर्णयानं पाकिस्तानची झोप उडाली, भारत होणार महाबली,

सध्या भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध अजूनही ताणलेलेचे आहेत. दोन्ही देशांनी एकमेकांवरील हल्ले थांबवलेले असले तरी अद्याप, सिंधू जलवाटप करार, विमानांसाठी हवाई क्षेत्रावरील बंदी, व्यापर बंदी यासारखे निर्णय अजूनही दोन्ही देशांनी कायम ठेवलेले आहेत. असे असतानाच आता पाकिस्तानची झोप उडवणारी माहिती रशियाने दिली आहे. या माहितीनंतर आता भारताचे बळ वाढणार असून पाकिस्तानसाठी मात्र हे चांगलेच धोक्याचे ठरू शकते. उर्वरित टप्पा भारताला नियोजित वेळेनुसार मिळणार मिळालेल्या माहितीनुसार रशियाचे भारतातील अधिकारी रोमन बाबूश्कीम यांनी भारताला सोमवारी (2 जून) एक महत्त्वाची माहिती दिली आहे. भारताला हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली एस-500 ची उर्वरित खेप नियोजित वेळेनुसार आगामी वर्षात म्हणजेच 2026 साली दिली जाईल, असे त्यांनी सांगितले आहे. भारताकडे सध्या असलेली S-400 ही अशी प्रणाली आहे, जी हवाई हल्ले परतवून लावण्याचे काम करते. भारताने ऑपरेशन सिंदूर




राबवल्यानंतर पाकिस्तानने भारतावर हल्ले केले होते. हे हल्ले याच S-400 प्रणालीच्या मदतीने निकामी करण्यात आले होते. आता याच प्रणालीचा उर्वरित टप्पा भारताला नियोजित वेळेनुसार मिळणार आहे. ही प्रणाली आल्यानंतर सामरिकदृष्ट्या भारत आणखी बलवान होणार आहे. यामुळेच पाकिस्तानची डोकेदुखी वाढू शकते. रशियाच्या अधिकाऱ्याने नेमकं काय सांगितलं? याबाबत पीटीआय या वृत्तसंस्थेने सविस्तर वृत्त दिले आहे. या वृत्तानुसार भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षादरम्यान एस-400 या प्रणालीने खूपच चांगले काम केले आहे, असे आम्ही ऐकले आहे. भारत आणि रशिया यांच्यात संरक्षण क्षेत्रात अनेक वर्षांच्या सहकार्याचा इतिहास आहे. माला मिळालेल्या माहितीनुसार उर्वरित एस-400 प्रणाली ही निर्धारित वेळेनुसार भारताला दिली जाईल, असे या अधिकाऱ्याने सांगितले आहे. तीन प्रणाली भारताला मिळाल्या दरम्यान, भारताने रशियासोबत 2018 साली तब्बल 5.43 अब्ज डॉलर्सचा एक करार केला होता. या कराराअंतर्गत रशिया भारताला एकूण पाच एस-400 अँटी मिसाईल डिफेन्स सिस्टम देणार आहे. या पाच पैकी एकूण तीन प्रणालींना पाकिस्तान तसेच चीनच्या सीमेलगत पश्चिमी तसेच उत्तर भागात तैनात करण्यात आलेले आहे. एस-400 प्रणालीची पहिली खेप भारताल डिसेंबर 2021 साली देण्यात आली होती.

## अमेरिकेत इस्रायली समर्थकांवर फेकले पेट्रोल बॉम्ब, अनेक जण गंभीर, 'फ्री पॅलेस्टाईन' च्या नावाने घोषणाबाजी



अमेरिकेतील कोलोरॅडो राज्यातील बोल्डर शहरात रविवारी (१ जून) इस्त्रायली ओलिसांच्या सुटकेची मागणी करणाऱ्या ज्यू समुदायाच्या शांततापूर्ण आंदोलनावर हल्ला करण्यात आला. एका अज्ञात हल्लेखोराने पेट्रोल बॉम्ब फेकत हा हल्ला केला. या भ्याड हल्ल्यात लहान मुलांसह 6 जण गंभीररित्या भाजले आहेत. तर अनेकजण जखमी झाले आहेत. अमेरिकेची सर्वोच्च तपास यंत्रणा एफबीआयने (FBI) या घटनेला "जाणीवपूर्वक केलेला दहशतवादी हल्ला" असे म्हटले आहे. एफबीआयने दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्याप्रकरणी ४५ वर्षीय मोहम्मद सबरी सोलिमन याला अटक करण्यात आली आहे. सोलिमनने पर्ल स्ट्रीटवर सुरू असलेल्या शांततापूर्ण मोर्चावर पेट्रोल बॉम्ब फेकल्याचा आरोप केला जात आहे. या घटनेमुळे आंदोलनकर्त्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. यात काही लहान मुलं आणि आंदोलन करणारे नागरिक गंभीररित्या जखमी झाले आहेत. प्रत्यक्षदर्शी काय म्हणाले? यावेळी प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हा हल्ला करणाऱ्या हल्लेखोराने 'फ्री पॅलेस्टाईन' अशा घोषणा दिल्या. या हल्लेखोराने माळीची वेशभूषा केली होती. ही वेशभूषा करत तो आंदोलनात सहभागी झाला.

## सप्टेंबर महिना धोक्याचा, हवामान विभागाच्या नव्या भाकितानं चिंता



या वर्षी पावसाचं प्रमाण देखील चांगलं राहणार असून, सरासरी 108 टक्क्यांपर्यंत पाऊस पडू शकतो. असा अंदाज भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. मात्र त्यातच देशासह राज्यात यंदा मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाला आहे, सामान्यपणे मान्सून महाराष्ट्रात सात जूनच्या आसपास दाखल होतो, मात्र यंदा 25 मे रोजीच राज्यात मान्सूनचं आगमन झालं आहे. म्हणजेच तब्बल 12 दिवस आधी मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. आता एक मोठी आणि चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे यंदा जगभरात तब्बल 19 चक्रीवादळं येणार असल्याचं भाकीत वर्तवण्यात आलं आहे. या संदर्भात लाईव्ह हिंदुस्थान या वेबपोर्टनं वृत्त दिलं आहे.

# किती राफेल पाडली विचारणाऱ्यांना एक सोपा प्रश्न, फक्त त्याचं उत्तर द्या

चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ अनिल चौहान यांनी सिंगापूरमध्ये शांगरी-ला डायलॉग सिक्युरिटी फोरमच्या पार्श्वभूमीवर रॉयटर्स आणि ब्लूमबर्गला एक मुलाखत दिली. त्यावरुन भारतीय राजकारणात मोठं वादळ उठलय. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारत-पाकिस्तान संघर्ष तीव्र झालेला असताना भारतीय सैन्य दलांकडून नियमित पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली जात होती. याचा माहितीमधला एक भाग CDS अनिल चौहान यांनी सिंगापूरमध्ये थोडा अधिक स्पष्टपणे सांगितला. त्यावरुन लगेच भारतातील




विरोधी पक्ष आक्रमक झाले आहेत. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी लगेच शनिवारी एक्सवर एक पोस्ट केली. "सीडीएसनी मुलाखतीत सिंगापूरमध्ये एक वक्तव्य केलय. त्यामुळे काही महत्त्वाचे प्रश्न विचारणं गरजेच आहे. संसदेच विशेष अधिवेशन तातडीने बोलावलं, तर तिथे हे प्रश्न विचारता येऊ शकतात. मोदी सरकारने देशाची दिशाभूल केली आहे. युद्धाचं धुकं आता क्लियर होतय" असं मल्लिकार्जुन खरगे यांनी पोस्टमध्ये म्हटलय. कारगिल समीक्षा समितीच्या धर्तीवर स्वतंत्र एक्सपर्ट समितीकडून संरक्षण तयारीची समीक्षा करण्याची त्यांनी मागणी केली जनरल चौहान यांनी सिंगापूर येथे दिलेल्या मुलाखतीत सुरुवातीला हवाई लढाईत नुकसान झाल्याच म्हटलं. किती विमानांच नुकसान झालं, तो आकडा त्यांनी सांगितला नाही. या लढाईत आपली विमान पाडल्याची ती पहिली अधिकृत कबुली होती. पाकिस्तानकडून सहा विमानं पाडल्याचा दावा होतो, तो बरोबर आहे का? असा प्रश्न ब्लूमबर्गने विचारला. त्यावर सीडीएस अनिल चौहान यांनी, 'हे पूर्णपणे चुकीच' असल्याच उत्तर दिलं. भारत-पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाल्यानंतर तीन आठवड्यांनी सीडीएसने हे वक्तव्य केलं. युद्धा दरम्यान किंवा त्यानंतही इंडियन एअर फोर्सने हवाई नुकसान झाल्याची बाब नाकारली नव्हती..

# यूक्रेन हल्ल्याने हडबडलेल्या पुतीन यांचा आण्विक सताप शैतान - २ क्षेपणास्त्र तैनात करण्याची तयारी

रशिया आणि यूक्रेन यांचे युद्ध जवळपासून दोन – अडीच वर्षे सुरुच आहे. गुड फ्रायडे निमित्ताने सुरु असलेली सिजफायर संपल्यानंतर रशियाने दोनदा युक्रेनवर हल्ले केले. यावेळी रशियाने रहिवासी विभागात हल्ले केले होते. याचा बदला अखेर युक्रेनने घेतला आहे. युक्रेनने रशियाच्या 4,000 किलोमीटर आत घुसून साहसी ड्रोन हल्ला केला आहे. युक्रेनच्या या हल्ल्यात रशियाच्या 40 हून अधिक लढाऊ विमानांचा अक्षरश: कोळसा झाला आहे. या हल्ल्याने क्रेमलिनमध्ये खळबळ



उडाली आहे. रशियाच्या एकूण पाच विमानतळांवर भीषण ड्रोन अॅटॅक झाल्याने राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन अक्षरश: हडबडले आहेत. युक्रेनने 40 हून अधिक लढाऊ विमानांचा अक्षरश: कोळसा केल्याने रशियाने एका जबरदस्त हल्ल्याची तयारी केली आहे. या आता ही वेळ पारंपारिक शस्रास्रांपर्यंत ही बाब मर्यादित राहणार नाही.या हल्ल्याला आता रशिया काय प्रत्युत्तर दिले जाते याकडे जगाचे लक्ष लागले असतानाच रशियाने सर्वात मोठा निर्णय घेतला आहे. रशियाचे आण्विक ताबूत तयार! रशियाकडे हा एकेकाळचा सुपरपॉवर देश आहे. त्याच्याकडे काही असे आण्विक शस्रास्रे आहेत जिच्यामुळे जग अवघ्या काही मिनिटांत नष्ट होऊ शकते. यातील सर्वात खतरनाक क्षेपणास्र "RS-28 सरमत" आहे, त्यास पाश्चात्य जगताने "Satan-2" असे नाव दिले आहे. हे आंतरखंडीय क्षेपणास्र आहे. या बॅलेस्टीक मिसाईलमध्ये 15-16 अणू बॉम्ब वाहून नेण्याची क्षमता आहे. याची रेंज 13,000 ते 16,000 किलोमीटर इतकी प्रचंड आहे. रशियाची प्रमुख घातक शस्रास्रे आणि क्षेपणास्रे 1. आंतरखंडीय बॅलिस्टिक मिसाईल (ICBMs) RS-28 Sarmat (Satan-2): हे रशियाचे सर्वात अत्याधुनिक आणि विनाशकारी ICBM आहे. जे आण्विक शस्रास्रे वाहून नेण्यास सक्षम आहे. हे क्षेपणास्र एकाच वेळी जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात हाहाकार माजवू शकतात. Tochka-U: हे मध्यम पल्ल्याचे मिसाईल आहे, जी शत्रूच्या ठिकाणांवर अचूक हल्ले करते. Iskander-M: हे मध्यम पल्ल्याचे परंतू अत्यंत घातक मिसाईल आहे. ज्याचा वापर महत्वाच्या लक्ष्यांना नष्ट करण्यासाठी केला जातो. उदाहरणार्थ कमांड सेंटर्स, वगैरे ठिकाणांना याने लक्ष्य केले जाते. 2. क्रूज मिसाईल Kalibr: रशियाची समुद्रावरुन डागता येणारी मिसाईल, जी अत्यंत अचूकपणे लक्ष्यभेद करते. यूक्रेन युद्धात या क्षेपणास्राचा अनेकवेळा वापर झाला आहे. Kh-101: हे लांबपल्ल्याचे एअर-लॉन्च क्रूझ मिसाईल आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com